महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
मंत्रालय (मुख्य इमारत), ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email ID : aditi.lembhe@nic.in
दूरध्वनी क्र. ०२२ २२७९४१२०

क्र:- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१५०/गृनिभू

दिनांक :- ०३ ऑगस्ट, २०२३

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र विधानसभा,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई ३२.

विषय :- सन २०२०-२१ या वर्षाचे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास <u>प्राधिकरणाचे वार्षिक लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवणेबाबत.</u>

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ च्या कलम ३९(४) नुसार प्राधिकरणाचे लेखे पुढील वित्तीय वर्ष संपण्यापुर्वी लेखापरिक्षण अहवालासह विधीमंडळास सादर करण्याची तरतुद आहे. त्यानुसार गृहनिर्माण विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २०२०-२१ या वर्षाचे लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवणे अपेक्षित आहे. तथापि, सदर लेखे विहित कालावधीत लेखापरिक्षण अहवालासह विधीमंडळास सादर करणे शक्य झाले नाही. सबब, प्राधिकरणाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्याबाबत झालेल्या विलंबाची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | तपशील | कारणे |
|---|---|---|
| १ | वार्षिक लेखे प्राधिकरणाने स्वीकृत केल्याचा दिनांक | दि.०२/०३/२०२२ |
| २ | लेखे परिक्षणासाठी महालेखाकार कार्यालयांकडे पाठविल्याचा दिनांक | दि.२१/०३/२०२२ |
| ३ | महालेखाकारांनी लेखापरिक्षण पूर्ण केल्याचा दिनांक | दि.१५/०५/२०२२ ते दि.२२/०७/२०२२ |
| ४ | लेखे लेखापरिक्षण अहवालासह म्हाडाने संमत केल्याचा दिनांक | दि.२३/११/२०२२ |
| ५ | विधीमंडळात वार्षिक लेखा अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे | कोविड-१९ च्या महामारीमुळे दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम झाल्याने आर्थिक वर्ष संपताच लेखे तयार करण्यास ऊशीर झाला. |

२. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक लेखे विधानमंडळास सादर करण्यास थोडासा विलंब झालेला आहे. सदरहू लेखे सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्याबाबत मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांना केलेल्या विनंतीची प्रत तसेच, लेख्यांच्या मराठी / इंग्रजी प्रती विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यासाठी यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. कृपया सदरहू लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात यावेत, ही विनंती.

आपली,

वल्सा नायर सिंह

सहपत्रे-वरीलप्रमाणे

( वल्सा नायर सिंह )
अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण)